**<u>नियमित फौजदारी खटला क्र.४५१/२०२४</u>**
**<u>निशाणी क्र.३९</u>**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,

नाव – नागरबाई दामोधर कोरडे
वय – ६७ वर्षे धंदा – गृहिणी
रा. एम.आय.डी.सी. भोसरी, पुणे

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती साधना बोरकर यांचेमार्फत**

फिर्यादी ही माझी मुलगी आहे. माझे मुलीचे लग्न आरोपी क्र.१ सुभाष ठोकळ यांचेसाबत झाले होते. मी माझे मुलीच्या लग्नामध्ये अर्धा तोळयाची अंगठी, चांदीची चैन व संसोरोपयोगी वस्तु देउन लग्न करुन दिले होते. लग्नानंतर पासुन माझे मुलीच्या सासरकडच्यांनी तिला त्रास देण्यास सुरुवात केली होती. परंतु लग्न झाले होते परत मुलीला घरी कसे आणायचे आज ना उद्या व्यवस्थीत होईल तसेच चालले होते. काही काळाने माझे मुलीला मुलगी झाली. माझे मुलीला माझे जावई मुलगी झाली म्हणून मारहाण करत होते.

२. माझे जावई यांनी माझे पतीला व माझे घरातील सर्वांना मारहाण केली होती. मुलगी झाल्यामुळे माझे मुलीला तिचे पती व सासु व इतर मंडळीनी खुप त्रास दिला. माझे मुलीला सर्व आरोपी मानसिक त्रास देत होते. माझे मुलीला तिचे सासरकडील सर्व मंडळी पांढ–या पायाची म्हणून हिनवत असे. माझे जावई मुलीला दारु पिउन मारहाण करायचे. मारहाण सोडवण्याकरीता कोणी गेले तर तो त्याला देखील मारहाण करायचा. माझे जावई यांनी माझे मुलीला रिक्षा घेणेकामी पैशाची मागणी केली होती. माझे मुलीने या प्रकरणात तक्रार दिली होती.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. एल.आर. गंगावणे यांचेमार्फत**

३. हे म्हणणे खरे आहे की, माझे जावई लग्नानंतर पासुन २० वर्षे आमचेकडे रहावयास होते. हे म्हणणे खरे आहे की, जावई यांचे आई वडील, बहीण भाउ हे गावाकडे रहायचे. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, माझी मुलगी गावी गेल्यास ते त्या ठिकाणी तिला त्रास दयायचे. माझी मुलगी तिच्या गावाकडे कधी व कोणत्या तारखेस गेली हे मी आजरोजी सांगु शकत नाही. जावई यांनी आम्हांला व आमच्या घरातील मंडळीना मारहाण केली या संदर्भात आम्ही पोलीस स्टेशनला तक्रार केली नाही. मारहाणी झालेबाबतचे दवाखान्याचे कागदपत्र आमच्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे जावई फक्त रिक्षाच चालवित होते. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, माझे जावई रिक्षा चालवित होते व कंपनीत देखील कामास होते. मी जावयाला रिक्षा घेणेकामी पैसे दिले होते, परंतु आजरोजी मला त्याची तारीख आठवत नाही. माझे मुलीला जावयाने नांदविणेकामी तीन नोटीसा दिल्या याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे मुलीला पहिल्यांदा व दुस–यांदा मुलगी झाली त्यावेळी तिच्या सासरची मंडळी पाहावयास आली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे मुलीला मुलगी झाल्यामुळे तिच्या सासर–यांनी तिला त्रास दिला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे जावयाने माझे मुलीला कोणत्याही प्रकारचा त्रास दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN
Digitally signed by SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN
Date: 2025.10.06 12:09:05 +0530

( एस.एस. चव्हाण )

दिनांक : २६/०९/२०२५

पिंपरी

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

पिंपरी, पुणे.